# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO २१००१:२०१८) (ISO/IEC २७००१:२०२२)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२१००/१३२
संकेतस्थळ : www.msbte.ac.in ई-मेल : secretary@msbte.ac.in

जा. क्र. मरातंशमिं/का-४० (परीक्षाविभाग)/F१०/२०२६/ ३०३ दिनांक: 14 AUG 2026

**परिपत्रक**

**प्रति,**
प्राचार्य,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्नित सर्व AICTE मान्यताप्राप्त संस्था

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) व त्यांचे हिवाळी-२०२६ परीक्षा अर्ज भरण्याकरीताचे वेळापत्रक**

**संदर्भ:** मंडळाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीताचे वेळापत्रक - MSBTE/D४०/AcademicCalender/२०२६/१५२ दि. १५/०५/२०२६

उपरोक्त संदर्भीय शैक्षणिक वेळापत्रकाच्या अनुषंगाने खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये **AICTE मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये नविन प्रवेशित** विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याकरिता Institute Login मध्ये Enrollment Link उपलब्ध करून देण्यात येईल.

**AICTE अभ्यासक्रमात नविन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता नोंदणी व परीक्षा अर्जाबाबतचे वेळापत्रक**

| अनु. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | संस्थास्तरावर नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन नियमित परीक्षा शुल्कासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | २१ ते ३१ ऑगस्ट, २०२६ |
| २ | नियमित परीक्षा शुल्क + रु. २००/- दंडासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | ०१ ते ०४ सप्टेंबर, २०२६ |
| ३ | नियमित परीक्षा शुल्क + रु. १,५००/- दंडासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | ०५ ते ०७ सप्टेंबर, २०२६ |
| ४ | विभागीय कार्यालय स्तरावर नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज व परीक्षा अर्ज निश्चित करणे | ०७ ते ०९ सप्टेंबर, २०२६ |
| **विभागीय कार्यालय स्तरावर AICTE अभ्यासक्रमात नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२६ परीक्षेकरिता परीक्षा अर्ज निश्चिती अंतिम दिनांक ९ सप्टेंबर, २०२६** | | |

**नोंदणी प्रक्रिया व परीक्षा अर्ज भरण्याबाबत सूचना:**

१) संस्थांनी थेट द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची Admission Level Eligibility माहिती भरून विभागीय कार्यालयाकडून निश्चित करावी. त्यानंतरच थेट द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया करता येईल.

२) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांनाच नोंदणी करता येईल. अशा पात्र विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज संस्थास्तरावर निश्चित (Confirm) केल्यानंतर लगेचच सर्व सत्रातील विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२६ करीता परीक्षा अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील.

३) नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय अधिकतम प्रवेशक्षमतेपर्यंत मर्यादित राहील. अधिकतम क्षमतेवरील विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी त्याच्या विशिष्ट प्रवर्गासाठी संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या परवानगीचे पत्र आवश्यक राहील.

४) इयत्ता बारावी(HSC) सायन्स उत्तीर्ण झालेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षातील विषयामध्ये सूट द्यावयाची असल्यास संस्थेने विद्यार्थ्यांची इयत्ता बारावी(HSC) सायन्सची गुणपत्रिका पडताळणी करून Online Exemption Subject Link मध्ये माहिती भरून विभागीय कार्यालयात अर्ज निश्चित करावयाचा आहे व त्यानंतरच सदर विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२६ परीक्षा अर्ज निश्चित करावे.

५) नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) हा महत्त्वाचा टप्पा असून सदर प्रक्रिया अचूकतेने करण्यात यावी. विशेषतः विद्यार्थ्यांचे नाव हे शालांत परीक्षेच्या प्रमाणपत्राप्रमाणेच असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या नावांमध्ये बदल असल्यास मंडळाचे परीक्षा विषयक नियमावलीनुसार RG-15 (पृष्ठ क्र. २३) नुसार कार्यवाही करावी.

६)- विद्यार्थ्यांची नोंदणी करतांना फोटोसह स्वाक्षरी असलेली अचूक इमेज अपलोड करणे बंधनकारक आहे. केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून प्राप्त फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज चांगल्या प्रतीची नसल्यास त्याऐवजी नवीन स्कॅन केलेली फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज अपलोड करण्यात यावी. नोंदणी प्रक्रियेनंतर इमेज (फोटोसह स्वाक्षरी) बदलासाठी मंडळाकडे अर्ज केल्यास रु. ५००/- दंड आकारूनच नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांचे फोटोसह स्वाक्षरी मध्ये बदल करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांची नोंदणी करतांना तसेच परीक्षा अर्ज भरतांना, संस्थांना कोणतीही अडचण आल्यास विभागीय कार्यालयाशी अथवा Institute login मधील मेसेज सिस्टीमद्वारे मंडळाशी संपर्क साधावा.

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी वर नमूद कालावधीमध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी करून त्यांचे हिवाळी परीक्षा-२०२६ करीताचे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयात निश्चित करावेत. विभागीय कार्यालय यांच्यामार्फत निश्चित झालेले परीक्षा अर्जच हिवाळी परीक्षा-२०२६ करीता ग्राह्य धरण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. मारुती रा. जाधव)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई -५१

**प्रत:**

१) मा. संचालक, म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सादर
२) उपसचिव, म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता.